सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००० ३६-२०१७

## नियमित दिवाणी दावा क्र. १२/२०१७

## निशाणी क्र. १७५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ सह आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१२ प्रमोदिनी विलास केळकर या दि.१०/११/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत हे वादी यांना समजले आहे. प्रतिवादी क्र.१२ चे प्रतिवादी क्र.१२अ व १२ब हेच वारस आहेत. तरी मयत प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस याकामी सामील करणेत यावे अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.११७ येथे मयत प्रतिवादी क्र.१२ यांचा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१२ प्रमोदिनी विलास केळकर या दि.१०/११/२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. वादीचे विलंबाचे नमुद केलेले कारण स्विकारार्ह नाही. प्रस्तुतचा दावा हा ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस, प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना खर्चाची रक्कम रुपये १००/– देण्याच्या अटीवर माफ करणेत येत आहे.

३. वादीने खर्चाची रक्कम भरुन अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१२ यांचे वारसांना दाव्यात समाविष्ट करावे व १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी. सदर आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2025.03.28 16:27:41 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः २६/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.